*नियमित दिवाणी मुकदमा क्र. १५/२०१६*
*निशाण क्र. १०३ लगत*



<u>वादीचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. व्ही.आर.नाईक यांचे मार्फत.</u>

१६. माझा जन्म सन १९६१ साली झाली. हे खरे की, या दाव्यातील बरेचसे प्रतिवादी ज्यांनी माझा दावा कबूल केला आहे ते माझ्यापेक्षा वयाने मोठे आहेत. या दाव्यातील सर्व महसुली कागद मी पाहिले आहेत. प्रतिवादी क्र.३३ चा या दावा मिळकतीपैकी सर्वे नं. १४३/३ शी संबंध आहे. या प्रतिवादीचा बऱ्याच वर्षापासून विहीरीच्या कारणाने या मिळकतीशी संबंध आहे. सर्वे नं. १४३/३ चे क्षेत्र मला सांगता येणार नाही.

१७. हे खरे की, मी दिलेल्या वंशावळीतील मूळ पुरुष बाबला याला मी पाहिलेले नाही. त्यांचा जन्म व मृत्यू कधी झाला ते मी सांगू शकत नाही. ते काय करत होते ते मी सांगू शकत नाही. हे खरे की, बाबला याचा मुलगा राम याला देखील मी पाहिले नाही व त्यांचा जन्म व मृत्यू कधी झाला हे मी सांगू शकत नाही. हे खरे की, रामची मुले रावजी, विठू , गोविंद, बाबू यांना मी कधी पाहिलेले नाही. हे खरे की त्यांचा जन्म व मृत्यू कधी झाला हे मला माहीत नाही. हे खरे की, या सर्वांच्या जन्म व मृत्यूचे दाखले मिळवण्याचा मी प्रयत्न केला नाही. वंशावळीतील माझे वडील बाबाजी यांचा जन्म दाखला मी हजर करु शकत नाही. हे खरे की, गणपतची मुले रामचंद्र, विष्णु, यांचे देखील जन्म दाखले मी हजर करु शकत नाही. हे खरे नाही की, गोविंदची मुले भिकाजी, कृष्णा यांना मी बघितलेले नाही. भिकाजी गोविंद हल्लीच मयत झाले. ते अंदाजे नऊ ते दहा वर्षापुर्वी मयत झाले.हे खरे की, बाबू यांचा मुलगा अनंत याला मी पाहिलेले नाही व त्यांचा जन्म व मृत्यूबददल मला काही माहिती नाही.हे खरे नाही की , मी दिलेली वंशाावळ पुर्णतः खोटी व काल्पनिक आहे.

१८. दावा मिळकती गावात नेमक्या कुठे आहेत ते मला माहीत आहेत. हे खरे की, दावा मिळकत अ ला बऱ्याच वर्षापासून प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची नावे नोंद आहेत. मला दावा मिळकतींची चतुःसिमा सांगता येईल. हे खरे नाही की, दावा मिळकत ब ला माझ्या कुटुंबातील कोणाचेही नाव आजतागायत नोंदलेले नाही. दावा मिळकत ब मधील सहाही मिळकतींना आमची नावे नोंदवलेली आहेत. दावा मिळकत क ही प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या नावाने कशी लागली याबाबत मी माहिती घेतली होती. या मिळकतींचा सातबारा मी बघितलेला आहे. हे खरे की,ही मिळकत कूळ कायदयाने प्रतिवादी क्र.१ ते३ चे वडील रामचंद्र यांच्या नावाने विक्री झालेली आहे. या मिळकतीची मिाहिती मला दावा दाखल केल्यापासून आहे. हे खरे की, दावा मिळकतीतील तीन मिळकती सोडल्यास इतर

मिळकतीत आंबा कलमांची नोंद नाही. दावा मिळकत अ मधील सर्वे नं.(८२) ५२अ हिस्सा नं.१६ याच्या चतुसिमा मला सांगता येतील. उत्तरेला सर्वे नं.८२/१५, पुर्वेला सर्वे नं.७८, पश्चिम व दक्षिणेला सांगता येणार नाही. या मिळकतीचे क्षेत्र किती आहे हे मला माहीत नाही. हे खरे की, सर्व जमिनीच्या चतुसिमा मला अचुकपणे सांगता येणार नाहीत. हे खरे की, दावा मिळकतीमधील आंबा लागवड कधीपासून केली आहे याबाबत कागदोपत्री पुरावा मी देऊ शकत नाही. हे खरे नाही की, दावा मिळकतीतील पीक पाणी याला मी शेती व आंबा कलम करतो म्हणून माझे नाव लागावे यासाठी मी कधी अर्ज केलेला नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, पीक पाण्याचा अर्ज केलेला नाही. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ते ३ सोडून मी व इतर प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये लागवड केल्याचे खोटे सांगत आहे.

१९. घर नं.२७९ चे वेगवेगळे भाग हे सर्वे नं.२/१ मध्ये आहे. या मिळकतीचे क्षेत्र मी सांगू शकत नाही. २७९ चे एकच घर आहे. या घराचे किती क्षेत्रफळ आहे ते मी सांगू शकत नाही. घर नं.२७९ चे वेगवेगळे भाग सन १९९० च्या पुढे झाले. हे वेगवेगळे भाग झाल्याबाबतचे कागद मी पाहिले आहेत. याबाबतचा ग्रामपंचायतचा ठराव मी हजर केलेला आहे. हे भाग होताना रामचंद्र किंवा त्यांच्या वारसांना नोटीसा दिल्यसा होत्या हे दाखवणारा कागद मी हजर करु शकत नाही. हे खरे नाही की, घर नं.२७९ मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे कुटुंब राहते व इतरांचा काही संबंध नाही. हे खरे नाही की, मी व इतर प्रतिवादींनी मिळून ग्रामपंचायतीला हाताशी धरुन या घर नं.२७९ चे वेगवेगळे भाग केले आहेत. हे खरे की, फेरफार क्र.६०५६ च्या कामकाजामध्ये मी किंवा माझ्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती समाविष्ट नव्हती. हे खरे की, त्यामुळे फेरफार क्र.६०५६ बाबत मला व्यक्तीगत माहिती नाही. हे खरे की, या फेरफारावेळी रामचंद्र गणपत यांनी दिलेल्या जबाबाविषयी मला माहिती नाही. हे खरे की, या जबाबावरील सही रामचंद्र गणपत यांचीच आहे का याबाबत मला खात्रीपुर्वक सांगता येणार नाही. हे खरे की, मी व इतर प्रतिवादींनी दावा मिळकतीला आमच्या नावाची नोंद करण्यासाठी केलेले अर्ज आयुक्तापर्यंत नामंजूर झालेले आहेत.

प्रश्न – दावा मिळकतीमधील १/२ हिस्सा रामचंद्र गणपत मासये यांनी दि.४/१/१९९१ रोजी रामचंद्र सदाशिव मासये व बाबू मासये यांच्याकडून खरेदी केलेला आहे.

उत्तर – आम्ही सर्वांनी मिळून खरेदी केलेला होता.

२०.        या खरेदीची माहिती मला खरेदी तारखेपासून होती असे म्हटल्यास बरोबर होईल. तेव्हापासून या मिळकतीला सर्वांची नावे लागावीत म्हणून मी प्रयत्न केले होते. सन २००७ मध्ये आम्ही प्रयत्न केले होते. हे खरे नाही की, रामचंद्र हे माझ्या कुटुंबातील जेष्ठ व्यक्ती होते हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. असा पुरावा मी याकामी हजर केलेला नाही.

२१.        मी प्रतिवादी क्र.१  दिलीप मासये ने दिलेली कैफियत वाचली आहे. हे खरे  की, या कैफियतीमध्ये घर नं.२७९ मधील  कुठल्याही भागात आम्ही कोणीही राहत नाही याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. हे खरे की, घर नं.२७९ चे वाटप व्हावे अशी मागणी मी दाव्यात केलेली नाही.  चिंचवाड मधील कूळ कायदयाने रामचंद्र यांना मिळालेल्या मिळकतीचा ३२म चा दाखला रामचंद्र यांच्या नावाने आहे. हेखरे की, हा दाखला मी कोणत्याही न्यायालयात आव्हानित केलेला नाही.

२२.        हे खरे नाही की, या सर्व दावा मिळकतीमध्ये पुर्वी रामचंद्र व त्यांच्या नंतर प्रतिवादी क्र.१ ते ३ हेच शेतीबागायती करतात. हे खरे  नाही की, या मिळकतीतील आंब्याची झाडे ही रामचंद्र यांनी लावलेली होती. हे खरे  नाही की, दि.४/०१/१९९१ रोजीच्या खरेदी खताची रक्कम ही रामचंद्र यांनी स्वकष्टार्जित उत्पन्नातून दिलेली आहे. आमच्या कुटुंबाच्या नावावरती माझ्या म्हणण्याप्रमाणे १६ मिळकती होत्या. या मिळकतींचे एकूण क्षेत्र किती हे मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, दावा मिळकतीशी प्रतिवादी क्र.१ ते३ वगळता आमचा काही संबंध नाही. हे खरे नाही की, खोटी व काल्पनिक वंशावळ बनवुन खोटा दावा केला. हे खरे  नाही की, प्रतिवादी क्र.१ ते ३ च्या कुटुंबाकडे माझा काही संबंध नाही. हे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/–

(श्रीमती एन.बी.घाटगे )

दि. ०८/०१/२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड